## प्र क र ण - ३ रे.

## कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे

## संक्षिप्त जीवन चरित्र.

## प्रकरण ३ रे – कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे संक्षिप्त जीवन चरित्र.

३.१ – प्रास्ताविक.

३.२ – कै. कर्म वीर डॉ. मामासाहेबांचे पूर्वज.

३.३ – कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे बालपण.

३.४ – कै. कर्मवीर डॉ. मामासाहेबांचे शिक्षण.

३.५ – कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे वैवाहिक जीवन.

३.६ – कै. कर्मवीर डॉ. मामासाहेबांची नौकरी व समाजकार्य.

३.७ – कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे शैक्षणिक व समाज शिक्षणाचे कार्य.

३.८ – कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे समाजकार्य व समाज शिक्षणाचे कार्य.

३.९ – कै. कर्मवीर डॉ. मामासाहेबांचा सन्मान व कर्मवीर डॉ. मामासाहेबांचे महानिर्वाण.

३.१० – कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब, एक शिक्षण तज्ञ.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रकरण ३ रे - कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे संक्षिप्त जीवन चरित्र.

## ३.१ - प्रास्ताविक -

या संशोधनात अभ्यासकांनी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी सामाजिक शिक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास केलेला आहे. कर्मवीर मामांनी स्त्री शिक्षण, विधवा व परित्यक्ता यांचे मुलांचे शिक्षण, अंधश्रध्दा निर्मूलन, श्रमप्रतिष्ठा व शेतक-यात जागृती याबाबत कार्य केलेले आहे. कर्मवीर मामांनी खेडयापाडयात बहुजन समाजासाठी शिक्षण प्रसाराचे कार्य केलेले आहे. अभ्यासकास मामासाहेबांनी समाज शिक्षणाचे जे कार्य केले आहे, ते अत्यंत महत्वाचे वाटते.

जगरहाटीप्रमाणे स्वत:चा संसार न करता मामासाहेब या कार्याकडे का वळले? लहानपणी, शिक्षण घेतांना व नौकरी करतांना त्यांच्यावर विशिष्ट व्यक्तींचा परिणाम झाला का? यासाठी मामांचा जीवन वृत्तांत अभ्यासकाने अभ्यासला आहे.

## ३.२ - कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे पूर्वज.

सोलापूर जिल्हयातील बार्शी तालुक्यात चारे हे एक छोटे गांव आहे. चारे गांव बार्शीच्या ईशान्य दिशेस १५ कि.मी. एवढया अंतरावर आहे. बार्शीवरून चारे येथे जाण्यासाठी सध्या एस.टी.ची सोय झाली आहे. १९४० च्या सुमारास बैलगाडी हेच वहातुकीचे साधन होते. बार्शी ते भूम व बार्शी ते पाथरी हे जाणारे दोन रस्ते आहेत. यांच्यामध्ये चारे गांव वसले आहे. येथील लोकांचा शेती व शेळया पालन हाच प्रमुख व्यवसाय आहे.

चारे गावांत जगदाळे आडनांव असणारी बरीच मंडळी आहेत. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे आजोबा बळवंतराव जगदाळे. बळवंतराव जगदाळे अंगात बाराबंदी व डोक्यावर चक्री पागोटे बांधत असत. शेती करणे हा बळवंतरावांचा व्यवसाय होता. शेतीला जोडधंदा म्हणून ते शेळ्या, मेंढ्या पाळत असत.

बळवंतरावांना चार मुलें होती. बापूराव, गोविंदराव, आबासाहेब आणि नानासाहेब, ही चार मुले शेळ्या- मेंढया पालन करणे या व्यवसायात मदत करीत असत. एकदा चारे गांवी निवृत्ती महाराज आले त्यांची किर्तने बळवंतरावांच्या घरी झाली. निवृत्ती महाराजांच्या उपदेशाचा परिणाम बळवंतराव यांच्यावर झाला. निवृत्ती महारांजांनी बळवंतरावांना वारकरी पंथाची दिक्षा दिली. जगदाळे घराण्यांत पंढरीची आणि आळंदीची वारी सुरु झाली. बळवंतरावांबद्दल सर्वांना खूप आदर होता. म्हणूनच त्यांची समाधी चारे येथील वाडयात बांधलेली आहे.

बळवंतरावांचा थोरला मुलगा बापूराव अकाली मरण पावला त्यामुळे गोविंदराव हेच कुटुंब प्रमुख झाले. गोविंदरावांनी पंढरीच्या वारीत कधी खंड पडू दिला नाही. गोविंदरावांचा स्वभाव करारी होता. ते नेहमी खरे बोलत. कोणाच्याही रागालोभाची पर्वा करीत नसत.

गोविंदरावांच्या पहिल्या पत्नी देवळालीच्या साठे घराण्यांतील होत्या. गोविंदरावांच्या पहिल्या पत्नी एका मुलीला मागे ठेवून लवकरच देवाघरी गेल्या. गोविंदरावांच्या दुसऱ्या पत्नीचे नांव मुक्ताबाई . मुक्ताबाई या भिकार सारोळे गावच्या येडे घराण्यांतील होत्या. भिकार सारोळे हे गांव उस्मानाबाद जिल्हयात आहे. हयाच मुक्ताबाई कर्मवीर डॉ. मामासाहेबांच्या मातोश्री होत. मुक्ताबाईंच्या पोटी ४ फेब्रुवारी १९०३ रोजी निवृत्तीचा जन्म झाला. हा निवृत्ती म्हणजेच कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे!

## ३.३ - कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे बालपण.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचा जन्म भिकार सारोळ्याला झाला. बाळाचे नाव निवृत्ती ठेवण्यात आले. निवृत्ती वयाच्या १० व्या वर्षी शाळेत जावू लागला. निवृत्ती अल्लड, हूड व उत्तम खिलाडू होता. पोहणे व आटया-पाटयाचा खेळ खेळणे यात निवृत्ती पटाईत होता. निवृत्तीला कुस्ती खेळणे व पोहणे अत्यंत आवडत असे. घोडयावर बसणे व घोडयाच्या पाठीवर उभे राहून घोडा पळविणे हया गोष्टी निवृत्ती करीत असे.

मुक्ताबाईचा निवृत्तीवर अत्यंत जीव होता. मुक्ताबाई पहाटे चार वाजता उठत असत. पायलीचे दळण जात्यावर दळत असत. दळण दळीत असतांना निवृत्ती आईच्या मांडीवर डोके ठेवून ओव्या ऐकत असे

## ३.४ - कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे शिक्षण.

वयाच्या १० व्या वर्षी निवृत्ती शाळेत जावू लागला. निवृत्तीची बुध्दी सामान्य मुलासारखीच होती. हुषार मुलगा म्हणून कधी निवृत्तीचे नांव गाजले नाही. तसेच ढ म्हणूनही गुरुजींनी कधी उल्लेख केला नाही. शाळेत इतिहास शिकत असतांना छत्रपती शिवाजी महारांजाच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकतांना निवृत्ती भान हारपत असे. यारे गावांत इयत्ता ३ री पर्यंतच शाळा होती. निवृत्ती इयत्ता ३ री पास झाला. गोविंदराव शिक्षणासाठी परगांवी ~~कारकवि~~ पाठवतील का? याची काळजी निवृत्तीला लागली होती.

* **शिक्षणासाठी गांव सोडले -**

निवृत्तीने आईजवळ पुढील शिक्षणासाठी बार्शीला जाण्याचा हट्ट धरला. बार्शीत निवृत्तीची राहाण्याजेवण्याची व्यवस्था कशी

करावी हा प्रश्न गोविंदरावांना पडला. बार्शी येथील भाऊराव पाटील हे गोविंदरावांचे जवळचे नातेवाईक होते. त्यांच्याकडे निवृत्तीची रहाण्याची जेवण्याची सोय केली. खेड्यातील मुलांचा बार्शी शहरात रहाण्याजेवणाचा प्रश्न मामांनी स्वत: अनुभवला होता. बार्शी येथे भाऊराव पाटलांच्या घरी जातांना मामांच्या आईने उपदेश केला.

> " पोरा पावन्याच्या घरी गोड बोलत जा.
> गोड वागत जा. इथल्यासारखा हट्ट करीत
> जाऊ नकू. वर तोंड उचलून कुनाला बोलू नकूस.
> मोकल्या येळला पावन्याच काई काम आसलं तर
> करायला मागपुढं बगू नकूस" १.

माऊलीच्या वरील बोलण्यावरून शहरात शिक्षणासाठी आलेल्या मुलांचा रहाण्या जेवणाचा प्रश्न किती बिकट होता याची कल्पना येते. पुढे मामांनी प्रथम मुलांच्या शिक्षणाची सोय न करता प्रथम त्यांच्या रहाण्या जेवण्यासाठी वसतिगृह काढले.

१९१९ साली निवृत्तीच इयत्ता चवथीत, बार्शी नगरपालिकेच्या मराठी मुलांची शाळा नं. १ मध्ये नाव घातले. त्यावेळी निवृत्तीच वय १७ वर्षाचे होते. निवृत्तीच्याच वर्गात संभाजी बारंगुळे हा एक अबोल विद्यार्थी होता. संभाजीबरोबर निवृत्तीची मैत्री जमली. संभाजी बार्शीतलाच रहाणारा असल्याने पोहणे व तालमीत जावून कुस्त्या करणे इ. बाबी निवृत्तीला शक्य होऊ लागल्या. हेच ते संभाजी बारंगुळे पुढे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष झाले.

शिक्षणाबाबत वडिलांचा दृष्टीकोन:-

निवृत्ती पाहुण्याच्या घरी राहून शिक्षण घेत होता. गोविंदराव

बार्शीला आले म्हणजे निवृत्तीची भेट घेत असत. वर खर्चासाठी काही पैसे देत असत. कागद, पेन्सिल, शाई इ. बाबीसाठी देखील ब-याच वेळा निवृत्तीजवळ पैसे नसत. गोविंदरावांची गरीबी होती, असे नाही पण त्यांचा शिक्षणाविषयीचा दृष्टीकोन. मुलाला शिक्षणासाठी पैसे न देणारे गोविंदराव वारक-यांना मात्र सढळ हाताने खर्च करीत. एकदा निवृत्ती वडिलांना म्हणाला होता.

> " मी पाहुण्यांना वरखर्चासाठी लागणारे पैसे मागणार नाही पण मी म्हणतो, तुम्ही वारक-यांना जेवण घालता, एकादशीला त्यांना शेंगाच्या पाट्याच्या पाट्या आणि वर गुळाची ढेकळे देता, मग मुलाच्या कागद पेन्सीलीच्या खर्चास पैसे देतांना का हात आखडता? " २.

१९२३ साली इयत्ता सातवीची परीक्षा निवृत्ती व संभाजीनी दिली. परीक्षा सोलापूरला झाली. बार्शीतून १७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. पैकी फक्त पाच विद्यार्थी पास झाले त्यात निवृत्ती व संभाजीचा नंबर होता.

## शिक्षण की संसार ? :-

गोविंदरावांना आपला मुलगा सातवी पास झाल्याचा आनंद झाला. पण मुलाला पुढे शिकविण्याची त्यांची इच्छा नव्हती. मुलाने लग्न करावे संसार करावा व परमार्थ साधावा अशी गोविंदरावांची इच्छा होती. इंग्रजी शिक्षण दिले तर मुलगा ख्रिस्ती होण्याचीही गोविंदरावांना भिती वाटत होती.

उन्हाळ्याची सुट्टी संपल्यानंतर वडिलांना न विचारता निवृत्ती बार्शीला आला. इंग्रजी शाळेत नाव घातले. संभाजी बारंगुळे यांनी शिक्षण बंद केले. पहिल्या वर्षी इंग्रजी पहिली ते तिसरी हे वर्ग निवृत्तीने केले. पुढील वर्षी

इंग्रजी चवथीही पास झाले, व नंतर पाचवीही पास झाले.

शिक्षण चालू असतांना मुलांच्या लग्नाचा विचार गोविंदरावांनी सुरु केला. निवृत्तीच्या नकारास गोविंदरावांनी जुमानले नाही. मानेगाव-च्या देशमुख घराण्यातील मुलीबरोबर निवृत्तीचा विवाह पक्का केला. लग्न चारे या गांवी झाले. लग्नाच्या तिस-याच दिवशी निवृत्तीने नवीन कपडे उतरले व जुने कपडे घालून बार्शी गाठली. पाहुण्याकडे जाण्यास त्यांचे मन धजले नाही. भाड्याने खोली करुन निवृत्ती राहू लागला. यावेळी ही संभाजी बारंगुळे यांची खूप मदत झाली. निवृत्ती इंग्रजी सहावी पास झाला.

पुढील वर्षी सातवीत नांव घातले. त्यावर्षी प्लेगाची साथ आली. या साथीत कृष्णात पाटलांची पत्नी वारली. त्यांच्या घरी स्वयपांक करण्या-साठी म्हणून कृष्णात पाटलांनी आपल्या बहिणींच्या मुलीला म्हणजेच निवृत्ती-च्या बायकोला बार्शीला आणले. बायकोच्या नादाने निवृत्ती घरी येईल असा पाटलांचा कयास होता. पण घडले उलटे. निवृत्तीने बार्शीच सोडले.

शिक्षण सोडले :-

किर्तन शिकावे अशी वडिलांची इच्छा होती म्हणून निवृत्तीने शाळा सोडून आळंदी गाठली. आळंदीला मारुती गुरवाच्या मार्गदर्शनाखाली निवृत्ती-ने धडे घेण्यास सुरुवात केली. याच काळात शंकरस्वामी आणि मा. दांडेकर यांचा सहवास घडला. तुकारामाची गाथा व ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे वाचनही याच काळात झाले. शाळा जरी सोडली असली तरी समाजाचे निरीक्षण होत होते, विविध स्वभावाच्या माणसांचा सहवास घडत होता. पंढरीला वारीला जाणा-या माणसातही बरी वाईट माणसे निवृत्तीच्या पहाण्यात येत होती. कांही ढोंगी महाराजही निवृत्तीच्या पहाण्यात आले.

त्यांच्या ऐतखाऊ वृत्तीबद्दल निवृत्तीला चीड येत होती.

पुन्हा शिक्षण :-

सुभद्रा ब. इर्लेकर ही निवृत्तीची मोठी सावत्र बहीण होती. दोघांचा परस्परावर फार जीव होता. सुभद्रा आक्काच्या मुलीचे लग्न होते. लग्नात मुलींच्या मामांनी नवरी मुलीच्या मागे उभे रहावयाचे असते असा प्रघात आहे. निवृत्ती त्यासाठी लग्नास आला. अंगात भगवे कपडे घालूनच निवृत्ती आल्याने सुभद्रा आक्काला खूप वाईट वाटले. सुभद्राआक्कांनी निवृत्तीला खूप समजावण्याचा प्रयत्न केला. संसार कर असे समजावले पण सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. शेवटी आक्कांच्या विनंतीला मान देवून निवृत्ती शिक्षण घेण्यास तयार झाला. सोलापूर येथील नॉर्थकोट हायस्कूलमध्ये इंग्रजी सातवीत [मॅट्रिक] निवृत्तीचे नाव नोंदले. या काळात संभाजी बारंगुळे, सुभद्राआक्का व इतर नातेवाईकांची निवृत्तीस मदत झाली. वर्षभर निवृत्तीने नियमित अभ्यास केला. मॅट्रिकची परीक्षा पुणे, मुंबई व धारवाड या ठिकाणी होत असे. मॅट्रिकची परीक्षा निवृत्तीने धारवाडला दिली. निवृत्ती मॅट्रिक परीक्षा १९३० मध्ये पास झाला.

शिक्षण संपले -

कॉलेजमध्ये जावून शिक्षण घेण्याची निवृत्तीची खूप इच्छा होती. पण वडिलांचा स्वभाव व आर्थिक अडचणी यामुळे त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. त्यांनी नोकरी करण्याचे ठरवले. त्यांना सोलापूर को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियन चे सुपरवायझर म्हणून १९३१ मध्ये तात्पुरती नोकरी मिळाली. काही दिवस नोकरी शिवायही त्यांना रहावे लागले. नोकरीसाठी त्यांची धडपड चालूच होती. १३ जून १९३२ पासून क्लेक्शन इन्स्पेक्टर म्हणून त्यांनी बार्शी नगरपालिकेत कामाला सुरुवात केली. नोकरी करत असतांना काही काळ त्यांनी दुधाचा धंदा केला. सरपणाचा अड्डाही काही काळ चालवला.

### ३.५ कै. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांचे वैवाहिक जीवन -

बार्शी म्युनिसिपालटीत नोकरी होती. लग्न अगोदरच झाले होते. जरी लग्न आपल्या मनाविरुध्द झाले असले तरी आपल्या पत्नीची काय चूक असा विचार निवृत्तीनी केला. आपल्या पत्नीला लक्ष्मीला बार्शीला आणले. विठ्ठल अर्जुन गोरे यांच्या वाड्यात घर करून ते राहू लागले.

निवृत्तीचा स्वभाव तापट व लक्ष्मीबाईची बुध्दी सर्वसामान्य असल्याने किरकोळ कारणावरून त्यांची भांडणे होऊ लागली. सुभद्रा-आक्कांनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला पण यश आले नाही. लक्ष्मीबाईला आपल्या पतीला समजून घेता आलेच नाही. शेवटी निवृत्तीने लक्ष्मीबाईस आपल्या वडिलांचे घरी चारे गांवी पाठवून दिले. नंतर मामी [लक्ष्मीबाई] काही काळ माहेरी व काही काळ सासरी चारे येथे राहू लागल्या. चारे येथे माहेरचे व सासरचे नांव राखत त्या जवळ जवळ शेवटपर्यंत राहिल्या.

कर्मवीर मामांचे वय सत्तर झाले होते. तेव्हा मामीचे वय ६४-६५ वर्षांचे झाले असावे. तोपर्यन्त मामांनी विविध वसतिगृहे शाळा विधवा परित्यक्तासाठी सोयी, दवाखाना इ. सोयी केल्या होत्या. पण मामी मात्र चार-यातच होत्या. त्या वारंवार आजारी पडत. संस्थेतील काही कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे मामांनी मामींना बार्शीला आणण्यास परवानगी दिली. मामा तर अर्धांगवायुमुळे आजारीच होते. मामींना औषधपाणी केले. त्या हिंडू-फिरु लागल्या त्यांनी मामांना पहाण्याची इच्छा व्यक्त केली. बोर्डिंगच्या ४-५ बायकाबरोबर मामींना मामांच्या खोलीत पाठवले. मामांनी मामींना ओळखलेच नाही.

" मामांनी सहज विचारले" कोण होत रे! सेवेसाठी असणा-या मुलांनी सांगितले बोर्डिंगच्या बाया होत्या" मामा गप्प बसले किती तरी दिवसांची ही विलक्षण भेट मामा कसे ओळखणार? आपल्या धर्मपत्नीलाच - अर्धांगीलाच कोण? म्हणून विचारण्याची पाळी यावी! केवढे हे कठोर वैराग्य! कठोर वैराग्याची स्तुती करण्यासाठी भाराऊन जावं की, अर्धांगीला ओळखले नाही या अतिकरुण घटनेत द्रवून जावं काहीच समजत नाही! " [३]

शेवटी मामांच्या मृत्युनंतर मामींना पार्थिव देहाजवळ आणले. त्यांना मामांच्या पार्थिव देहाशेजारी बसवले. मामी मामांच्या चरणावर कोसळल्या. हीच त्यांची शेवटची स्पर्श भेट! असे उभयतांचे वैवाहिक जीवन!

३.६ कै. कर्मवीर डॉ. मामासाहेबांची नोकरी व समाजकार्य :-

म्युनिसिपालिटीत नोकरी करावी व खाणावळीत जेवण घ्यावे असे काही दिवस गेले. विचार करतांना गत आयुष्याच्या आठवणी त्यांना येत. शिक्षणात झालेला त्रास आठवे. पाहुण्यांच्या घरी जेवतांना झालेली कुंचंबणा त्यांना आठवे. अशा प्रकारचा विचार करतांना एक पुण्यकर्म करण्याची त्यांना कल्पना सुचली!

बहुजन समाजाचे नशीब उजाडले :-

मॅट्रीक झाल्यानंतर नोकरी शोधण्याच्या निमित्ताने मामासाहेब गांवे हिंडले होते. सांगली, सातारा, कोल्हापूर, पंढरपूर, इचलकरंजी या गावांना मामा नोकरी शोधण्यासाठी हिंडले होते. कोल्हापूर येथे राजर्षि शाहू महाराजांनी निरनिराळ्या जमातींसाठी काढलेली निरनिराळी वसतिगृहे त्यांनी पाहिली होती.

कर्मवीर भाऊराव पाटलांनी सातारा जिल्हयात बहुजनसमाजासाठी शिक्षणाची सोय केली होती. सोसायटया तपासण्याच्या निमित्ताने मामासाहेबांचे खेडयातून हिंडणे झाले होते. खेडयाची अवस्था त्यांनी उघडया डोळ्यांनी पाहिली होती. या समाजासाठी आपण काही तरी करावे असे त्यांच्या मनाने घेतले. शिक्षणाशिवाय समाज सुधारणार नाही हे मामांनी जाणले. बार्शी शहरात खेडयातून शिक्षणासाठी येणा-या विद्यार्थ्यांची सोय करावी म्हणून मामांनी १९३४ साली एका विद्यार्थ्यास घेऊन बोर्डींग सुरु केली।

> " ज्ञानदीप लावू जगी" ही संतांची शिकवण मामासाहेबांनी १९३४ साली म्हणजे वयाच्या एकतिसाव्या वर्षी आचरणात आणली. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवप्रभूंच्या नावानेच या शुभकार्याचा श्रीगणेशा केला. एका विद्यार्थ्याला घेऊन श्री शिवाजी मराठा बोर्डिंग सुरु केली. पुढे तिचे "श्री शिवाजी बोर्डींग असे नामकरण झाले आणि त्यानंतर १९४६ साली "श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ " या नावांने ती रजिष्टर झाली. तरीही हे मंडळ अजूनही "मामांची संस्था" " मामांची बोर्डिंग " म्हणूनच ओळखले जाते. "[४]

वसतिगृहाला सर्वांचे सहकार्य लाभावे व जास्त मुलांची राहण्याजेवण्याची व्यवस्था व्हावी म्हणून मामांनी ५ ऑगष्ट १९३४ रोजी प्रतिष्ठीत व्यक्तिंना विचार विनिमय करण्यासाठी एकत्र बोलाविले. श्री. कृष्णांत राऊत यांना अध्यक्ष व श्री. नरसिंग तात्या देशमुख यांना सेक्रेटरी केले. वसतिगृहाची सर्व व्यवस्था पाहण्याचे स्वत: मामांनी ठरविले.

विद्यार्थी व ज्वारी गोळा करण्यासाठी परिश्रम :-

बोर्डिंगची स्थापना झाली. मुलांची संख्या वाढावी म्हणून मामा

7525

A

प्रयत्न करु लागले. मामांची बहिण सुभद्राआक्का आणि बळवंतराव उस्मानाबादला राहत होते. त्यांना चार मुले होती. बळवंतराव वकिलीचा व्यवसाय करीत होते. मामांनी बळवंतरावांच्याकडे मुलांना बोर्डिंगमध्ये पाठविण्याबाबत विषय काढला. बळवंतरावांनी नकार दिला. तरीपण सुभद्राआक्कांनी एक मुलगा मामाबरोबर पाठवलाच. तसेच पुन्हा सर्वांनाच आक्कांनी मामांच्या बोर्डिंगमध्ये पाठवले. हीच मुले निवृत्तींना "मामा" म्हणत बोर्डिंगमधील इतर मुलेही मामाच म्हणू लागली. निवृत्ती जगदाळे हे पुढे सर्वांचेच मामासाहेब जगदाळे झाले.

मामा नोकरी सांभाळून सुट्टीच्या दिवशी खेडोपाडी हिंडत असत. पालकांना शिक्षणाचे महत्व समजावून सांगत असत. तेथील प्राथमिक शाळेत जाऊन हुषार विद्यार्थ्यांना बोर्डिंगमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करीत असत. गरीब विद्यार्थ्यांना बोर्डिंगमध्ये मोफत ठेवून घेत असत. त्यासाठी खेडयापाडयातून हिंडून ज्वारी जमा करत असत. त्यासाठी खेडयापाडयातून हिंडून ज्वारी जमा करत असत. पहिल्याच वर्षी बोर्डिंगमधील दहा विद्यार्थ्यांपैकी आठ विद्यार्थ्यांना बोर्डिंगमध्ये मोफत प्रवेश दिला होता. बोर्डिंगमध्ये फी चे दर विद्यार्थ्यांच्या परिस्थितीनुरुप असत. व वर्तणूक मात्र सर्वांना समान मिळत असे. अशा त-हेने मुले व ज्वारीसाठी मामांनी अहोरात्र परिश्रम घेतले. १९४०-४१ साली मुलांची संख्या ११२ पर्यंत गेली होती. सुरुवातीस बोर्डिंग गावातच काही वाडयामध्ये चालू केले होते.

श्री शिवाजी बोर्डिंगची भरभराट :-

नगरपालिकेकडून बोर्डिंगला सुरुवातीच्या काळात मदत मिळाली. मामासाहेब नगरपालिकेत नोकरीला असल्याने ही मदत मिळविणे सोपे गेले. गावांतील जागा अपूरी पडू लागली. स्वत:ची जागा असावी हयासाठी

मामांनी प्रयत्न केले व बी.जी. मोहिते यांच्या सहाय्याने शहराच्या पश्चिमेला असलेली स. नं. ३०१ पैकी एक एकर तीस गुंठे जागा संस्थेसाठी खरेदी केली. कामासाहेब झाडबुके यांनीही त्याच जमीनीलगतची स्वतःच्या मालकीची दोन एकर जागा संस्थेला बक्षीस दिली.

शाळा सुटल्यानंतर मामा स्वतः विद्यार्थ्यांना घेऊन जमीनीची साफ-सफाई करु लागले. जमिनीवरील खड्डे बुजू लागले. तेथेच खेळाचे मैदान केले. विद्यार्थी तेथे कबड्डी आटयापाटया खेळू लागले. मामांना आता इमारतीचे वेध लागले. ८ जानेवारी १९३९ रोजी इमारत कोनशिला समारंभ झाला. विद्यार्थ्यांच्या मदतीने इमारतही पूर्ण झाली.

प्रथम खेडयातील पालक मुलांना पाठवत नसत नंतर मात्र मुलांना पाठवू लागले. तसेच खेडयापाडयातून ज्वारीही भरपूर प्रमाणात मिळू लागली.

> " मुलांनी पोतं घेऊन दारोदार जावं आणि शेतक-याच्या बायकांनी सुप भरुन टोपली भरुन धान्य पोत्यात टाकाव अस घडू लागलं. काही ठिकाणी ज्वारीनं भरलेलं पोतंच उचलून न्या म्हणणारे शेतकरी भेटले स्वतःच्या बैलगाडया जुंपून लोक धान्य बार्शीला आणून पोचवायचीही मदत करु लागले. सन १९४० ते १९४३ च्या दरम्यान शेतकरी बंधूंनी संस्थेला १०९० पोती ज्वारी जमा करून दिली " ५.

कर्मवीर मामासाहेब वसतिगृहाचा व्याप सांभाळून स्वतः नोकरीही करीत होते. पण नंतर कांही कारणास्तव नोकरी सोडली व मामासाहेब वसतिगृहाचेच काम करु लागले.

३.७ कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे शैक्षणिक व सामाजिक शिक्षणाचे कार्य -

मामांनी समाजाचे जवळून निरीक्षण केले होते. अंधश्रध्दा, अनिष्ठ रूढी, खोट्या प्रतिष्ठा, स्त्रियांना कमी दर्जाची वागणूक असे समाजाचे दोष मामांच्या लक्षात आले होते. मुलांच्या व मुलींच्या शिक्षणाची सोय करणे हे तर गरजेचे आहेच पण त्याचबरोबर त्यांच्या आईवडिलांनाही शिक्षण देण्याची गरज आहे, असे मामांचे मत झाले होते. शैक्षणिक कार्य करीत असतांना मामांनी समाज जागृती करण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजाचे दु:ख कोणते? ते नाहीसे करण्याचा मामांनी प्रयत्न केला. तसेच दु:खाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला व त्यावर स्वानुभवाने तोडगा सांगितला.

मामांचे शैक्षणिक कार्य व सामाजिक शिक्षण आपणाला वेगळे करता येणार नाही. पुढील बाबीवरून त्यांच्या कार्याची ओळख होते.

अ] कर्मवीर मामासाहेबांनी सुरु केलेली वसतिगृहे -

मामासाहेबांची वसतिगृहे " मामांची बोर्डिंग " म्हणून सर्वत्र ओळखली जातात. मामासाहेबांनी विद्यालय सुरु करण्यापेक्षा वसतिगृह सुरु करण्याला अधिक महत्व दिले. कारण वसतिगृहामुळे मुलांची राहण्या-जेवणाची सोय करता यावयाची व मुलांना हवे तसे वळण लावता येत असे. १९३४ साली मामांनी " श्री शिवाजी बोर्डिंग " सुरु केले. स्वत: रात्रंदिवस मेहनत करून पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून देवून वसतिगृहात मुले जमा केली. खेड्यापाड्यात सायकलवरून हिंडून ज्वारी जमा केली. मुलांना श्रमाची सवय लावून त्यातूनच वसतिगृहाची प्रगती केली. बार्शी भोवतालच्या खेड्यात तसेच उस्मानाबाद जिल्हयातील खेड्यात वसतिगृहे सुरु केली. [ परिशिष्ट क्रमांक ६ पहा] खेड्यातील वसतिगृहात, आपल्याच वसतिगृहातील माजी विद्यार्थी प्रमुख म्हणून ठेवण्याची व्यवस्था केली. ३० नोव्हेंबर १९४७ रोजी ह.भ.प.संत गाडगे महाराज यांच्या हस्ते" भारतीय बालिकाश्रम" हे मुलींसाठी वसतिगृह सुरु केले.

कर्मवीर मामांची वसतिगृहे म्हणजे विशिष्ट प्रकारची जीवन पध्दती होती. श्रम व शिस्त या दोन गोष्टीला अत्यंत महत्व होते. कर्मवीर मामासाहेबही बार्शीच्या वसतिगृहातील एका खोलीत रहात असत. विद्यार्थी जे अन्न घेत तेच जेवण मामासाहेब घेत असत. थंड पाण्याने स्नान करीत असत. स्वत:चे कपडे स्वत:च धूत असत. [ अपघात झाल्यानंतर बंद केले ] काही महत्वाचा समारंभ असेल तर ते कपडयांना इस्त्री करीत. इस्त्रीचे पैसे संस्थेतून न देता स्वत:चे पैसे देत असत. मामांना कोथिंबीरची भाजी जेवताना खाण्यास आवडत असे. म्हणून गावांतून ते कधीकधी कोथिंबीरची पेंडी आणत असत. हा खर्चही ते संस्थेकडे टाकत नसत. वेळप्रसंगी मामांनी २०-२० मैलावरून सायकलीवर वसतिगृहासाठी ज्वारी जमा केली होती. पण याच संस्थेतील पैसे स्वत:साठी खर्चत नसत.

वसतिगृहातील वेळापत्रक खालील प्रमाणे असे.

| | | |
|---|---|---|
| पहाटे | ५.३० | - सर्वांनी उठणे. |
| | ६.०० | - धावण्याचा व्यायाम. |
| | ७.०० | - नाष्टा व बातम्या वाचन. |
| सकाळी | ८ ते १० | - अभ्यास. |
| | १० ते ११ | - जेवण. |
| | ११ ते ५.३० | - शाळा. |
| | ५.३० ते ६ | - खेळ विश्रांती. |
| सायंकाळी | ६ ते ६.३० | - श्रम. |
| | ६.३० ते ७.३० | जेवण. |
| | ८ ते १० | - अभ्यास |
| रात्री | १०.३० ते ५.३० | - झोप. |

वरील वेळापत्रकात ऋतुमानानुसार थोडा बदल केला जाई. सुट्टीच्या

दिवशी १ ते २ तासापर्यंत काम करावे लागे. सुरुवातीच्या काळात तर मुले रोजे २ तास काम करीत व सुट्टीच्या दिवशी तर ३-४ तासापर्यंत काम करीत विहिरी खोदणे व जमीन सपाट करणे अशीही कामे मामांनी विद्यार्थ्यांकडूनच करवून घेतली.

## आहार व व्यायाम :-

वसतिगृहात अत्यंत साधा व पौष्टीक आहार असे. तूर डाळीची आमटी, भाकरी व एक पालेभाजी एवढेच जेवणात असे. नाष्टयासाठी आधीच भाकरी व पिठले असे. रविवारी चपाती , भात, वरण, लिंबू व एखादा गोड पदार्थ असे. तळलेले पदार्थ व पचनास जड पदार्थ सहसा जेवणात नसत. ज्वारीचा हुरडा, मक्याची कणसे, ऊस, पेरू ,पोपई, टोमॅटो अशी फळे मधून मधून खाण्यास मुलांना मिळत असत. सर्वांना वाढल्याशिवाय कोणीही जेवणास सुरुवात करावयाची नाही असा दंडक असे. संपूर्ण वाढ झाल्यानंतर प्रार्थना होत असे.

वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे ।
सहज हवन होते नाम घेता फुकाचे ।
जिवन करि जिवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म ।
उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म.।

गरजेपेक्षा जास्त अन्न घेतले व ते वाया घालविल्यास कडक शिक्षा असे.

आहार व्यायाम व श्रम यांचा उत्तम मेळ मामासाहेबांनी घातला होता. सकाळी साधारण १ मैल पळून आल्याशिवाय नाष्टा मिळत नसे. काम केल्याशिवाय जेवण नसे. कबड्डी किंवा कुस्ती अशा खेळात भरपूर सराव करणाऱ्या विद्यार्थ्यांना मामा पावशेर दूध मोफत देत असत. नेहमी काटकसर करणारे मामा श्रम करणाऱ्याबाबत व व्यायाम करणाऱ्याबाबत कधीच काटकसर करीत नसत.

विधवा विधुर व परित्यक्ता यांची सोय -

वसतिगृहामध्ये स्वयपाक करण्यासाठी स्त्रिया निवडण्याची मामांची पध्दती अत्यंत वैशिष्टपूर्ण होती. विधवा परित्यक्ता यांना मामांनी प्राधान्य दिले. वास्तविक पहाता अशा स्त्रियांना कामासाठी ठेवणे ही डोकेदुखी होती कारण अशा स्त्रियांच्या घरच्यांना ब-याचदा आवडत नसे. पण मामांनी त्यांची कधीही पर्वा केली नाही. ज्या विधवेला १-२ मुले आहेत. तिला मामा स्वयंपाकाचे काम देत. त्यांची सर्वांची रहाण्याजेवण्याची सोय करीत. त्यांच्या मुलांची शिक्षणाची सोय करीत व वरखर्चासाठी आणखी दरमहा पगार देत. जर मजूरीने स्वयंपाक करण्यासाठी स्त्रिया लावल्या असता तर फक्त पगारातच काम भागले असते. पण मामांनी अशा स्त्रियांना अभय दिले व त्यांच्या मुलांची शिक्षणाची सोय केली.

ज्यांच्या आई, वडील किंवा भावाने काम केले आहे. अशा विद्यार्थ्यांपैकी बरेच विद्यार्थी मोठ्या पदावर पोहचलेले दिसून येतात.

मामांनी स्त्रियांच्या बाबतच हा दृष्टीकोन ठेवला असे नाही तर ज्यांची पत्नी वारली आहे. त्यांची व त्यांच्या मुलांची जेवणाची सोय नाही. अशाही विधुर पुरुषांना मामांनी काम दिले व त्यांच्या मुलांची शिक्षणाची सोय केली.

विधवा व विधुरांना मामांनी मोफत सांभाळले नाही. त्यांच्या मुलांना फुकट जेवण दिले नाही. ही अत्यंत महत्वाची बाब आहे.

वसतिगृहातील कामाची व्यवस्था -

वसतिगृहातील सर्व कामे विद्यार्थीच करीत असत. फक्त फी जमा करण्यासाठी लेखनिक असे. पाणी आणणे, भाकरी मोजणे, पीठ व भाजीचे

साहित्य पुरविणे, ज्वारी दळून आणणे, भाजी विकत आणणे, वाढण्याची व्यवस्था, विद्यार्थ्यांना सूचना देणे, विद्यार्थ्यांकडून कामे करवून घेणे, विद्यार्थ्यांना अभ्यासाला बसविणे, विद्यार्थ्यांना उठविणे, विद्यार्थ्यांच्या न्यायाकडे लक्ष देणे, वर्तमान पत्रांचे वाचन करणे, आठवडयाच्या सभेचे कामकाज चालविणे व वेळप्रसंगी शिक्षाही करणे ही सर्वच कामे विद्यार्थीच करीत असत.

वसतिगृहात कामकाज पहाण्यासाठी मंत्रिमंडळ असे. प्रत्येक खात्यासाठी मुख्य व उपमंत्री असे. त्या दोघांना मदतीसाठी आणखी सात मंत्री घेण्याची मुभा होती. आठवडयाच्या सात दिवसांपैकी एका दिवशी एका मंत्र्याचे काम करावे अशी योजना होती. कारण दोघांनीच संपूर्ण आठवडा काम पाहिल्यास त्यांचा अभ्यास बुडेल म्हणून ही व्यवस्था होती.

खाती खालील प्रमाणे असत. वसतिगृहातील कारभाराची खाती.

१] भोजन खाते. २] भाजी खाते. ३] वादविवाद खाते ४] क्रिडा खाते.

१] <u>भोजन खाते</u> -

विद्यार्थ्यांच्या पाळ्या लावून भोजनाच्या संदर्भातील सर्व कामे करून घेणे. दळण आणणे, पाण्याची व्यवस्था, पीठ देणे, भाकरी मोजून घेणे, भाजीचे साहित्य देणे व वाढण्याची व्यवस्था करणे.

२] <u>भाजी खाते</u> -

संस्थेच्या आफीसमधून भाजीसाठी पैसे घेणे व गावांतून भाजी खरेदी करून आणणे व पैशाचा हिशोब देणे.

३] <u>वादविवाद खाते</u> :-

दररोज वर्तमान पत्रातील ठळक बातम्या वाचून दाखविणे. आठवडयाच्या सभेचे नियोजन करणे. उपस्थित असणारे व सभेत बोलणारे यांच्या नोंदी ठेवणे.

४] क्रिडा खाते -

हे खाते अत्यंत महत्वाचे समजले जात असे. पळण्यास जे जातील त्यांच्या रोजच्या रोज नोंदी करणे. जे पळण्यास जाणार नाहीत त्यांचा नाष्टा बंद करणे. जे उठण्याची वेळ झाल्यानंतरही झोपून राहतील त्यांना शिक्षा करणे. जे कामासाठी हजर असणार नाहीत त्यांच्या नोंदी करणे व त्यांना मामांच्या समोर हजर करणे. त्यांना मामा काठीने मारत असत. जे नळावर आंघोळ करतील , मिश्रीचा कागद कोठेही टाकतील, जे लघवीस कोठेही बसतील जे अभ्यास करीत नसतील अशांची नांवे मामांना सांगणे ही कामे क्रीडा मंत्र्यांची होती.

वसतिगृहात रहाण्यासाठी ज्वारी व फी -

ज्या विद्यार्थ्याला मामांच्या वसतिगृहात प्रवेश हवा असेल त्या विद्यार्थ्याला प्रसंगी पालकाला मामांच्या समोर जावे लागत असे. मामा प्रश्न विचारून त्यांच्या आर्थिक स्थितीचा अंदाज घेत. त्या मुलांच्या गावचा आणखी एकादा विद्यार्थी असेल तर त्याच्याकडून खात्री करीत व दरमहाची फी ठरवत म्हणजे जातपात न विचारात घेता आर्थिक स्थितीचा विचार करून मामासाहेब विद्यार्थ्यांच्या फी ठरवत ज्वारी मात्र दीड पोते [म्हणजे १६८ किलो] सर्वांना द्यावी लागत असे. जर फारच आर्थिक स्थिती गरिबीची असेल तर ज्वारीतही मामासाहेब सूट देत असत.

नेतृत्वगुण वाढीसाठी वसतिगृहात प्रयत्न -

वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याबाबत कटाक्ष असे. प्रकृती सुदृढ हवी, अभ्यास चांगला हवा, त्याचबरोबर आपले विचार व्यक्त करता आले पाहिजेत. असे मामांचे मत होते.

मामांच्या वसतिगृहात खास वादविवाद खाते असे. त्यानुसार दररोज ठराविक बातम्यांचे वाचन होत असे. दर आठवडयाला सभा घेतली जात असे. सभेचा विषय आठवडा आगोदरच सांगितलेला असे. प्रत्येकाने त्या विषयावर बोललेच पाहिजे असा मामांचा दंडक होता. वसतिगृहातील मुलींना देखील मामा बोलण्यास सांगत.

> " मी वसतिगृहात रहात होते. वसतिगृहात दर आठवडयाला विद्यार्थ्यांच्या सभा होत. सभेला मामा हजर रहात. सभेचा विषय आठवडाभर अगोदर जाहीर केला जाई. सभेत मुले बोलत पण आम्ही मुली बोलत नसू. मामांना हे आवडत नसे. मुलींना बोलके करण्यासाठी ते गप्पा सुरु करीत. त्यामुळे आम्हां मुलींना बोलण्याची प्रेरणा मिळे आणि एका सभेला "विज्ञान शाप की वरदान " ह्या विषयावर मी बोलू शकले "६.

असे श्रीमती माळकर यांनी आपल्या आठवणीत लिहलेले आहे.

वसतिगृहातील सर्वच कामे मुलावर मामासाहेब सोपवत. मुलांचे मंत्रिमंडळ असे. त्यामुळे मुलामध्ये आपोआपच नेतृत्वगुण निर्माण होत असत.

श्रमाची आवड निर्माण व्हावी म्हणून वसतिगृहात प्रयत्न -

मुलांनी श्रम करावेत म्हणून मामा सतत प्रयत्न करीत असत. श्रम न करणारास ते शिक्षाही करीत असत. दिवसातून वसतिगृहातील मुलांना एक तास तरी कामाला लावत. धोब्याकडून मुलांनी कपडे धुवून घेतले तर मामा अशा विद्यार्थ्याला बोलावून शिक्षा करीत असत.

आर्थिक स्थिती गरीबीची असणारांना ते सुट्टीतील काम देत असत. त्याला आर्थिक मोबदला देत असत. त्या काळात त्यास जेवण मोफत देत असत. मामांची बहीण सुभद्राआक्का एकदा चाऱ्याला चालल्या असता त्यांचा मुक्काम

वसतिगृहातच पडला. सुभद्राआक्काने मामांना शिकण्यासाठी मदतही केलेली होती. आक्काचे जेवणाचे पैसे घेऊन मामांनी रितसर वसतिगृहाची पावती दिली.

तेच मामा श्रम करणारास मोफत जेवण देतात. श्रम करणा-याजवळ मामांना आदरभाव होता. श्रम करणा-यांत मामा तासन तास मिसळत. मामा नेहमी म्हणत.

" दोन बोटांनी काम करणा-यापेक्षा दहा बोटांनी काम करणा-यांची प्रतिष्ठा वाढली पाहिजे " ७.

शिस्त, स्वावलंबन व नैतिक विकास -

वसतिगृहात मामांची शिस्त अत्यंत कडक असे. उठण्याची वेळ झाल्यानंतर न उठणारास मामा काठीने बडवत असत. गोंधळ घालणे, सिनेमा पाहणे, रांगा मोडणे अशा गोष्टी वसतिगृहात घडल्यास मामा शिक्षा करीत असत. स्वत:चे ताट, वाटी व तांब्या स्वत:च विद्यार्थ्यांना घासावा लागे. वसतिगृहातील खोल्या झाडणे, पाण्याचा हौद स्वच्छ करणे, कपडे धुणे ही कामे विद्यार्थ्यांनीच केली पाहिजेत. असा मामाचा कटाक्ष असे.

खोटे बोलणे, चोरी करणे, लबाडी करणे मुलींची टिंगल करणे अशा गुन्हयासाठी मामा जबर शिक्षा करीत असत.

मामासाहेबांचे वसतिगृह म्हणजे जीवन शिक्षणच होते. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याची सर्वच भक्कम तयारी वसतिगृहात होत असे. अभ्यासकांस मामासाहेबांच्या वसतिगृहात विद्यार्थी म्हणून राहण्याचे भाग्य लाभलेले आहे.

ब] व्हॉलंटरी शाळा -

कर्मवीर मामांनी बार्शीला शिवाजी बोर्डिंग सुरू केले.

खेड्यापाड्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी बार्शीला येऊ लागले. पण काही गावांत इ. ३ री पर्यंत देखील शाळा नसत. अशा गावांत शाळा सुरु करण्यासाठी कर्मवीर मामांनी एक साक्षरता मंडळ स्थापन केले. बार्शी तालुक्यातील पन्नास गावांत या मंडळा मार्फत प्राथमिक शाळा सुरु केल्या.

> " १९४० मध्ये साक्षरता प्रसारक मंडळ बार्शी ही संस्था स्थापन झाली. या संस्थेतर्फे १९४० ते १९५५ पर्यंत बार्शी तालुक्यातील पन्नास खेड्यात व्हॉलंटरी शाळा काढून प्राथमिक शिक्षणाचा जोरदार प्रचार केला " ८.

या शाळांसाठी सरकारचे अनुदान अत्यंत अल्प असे. साक्षरता मंडळामार्फत रेशन दुकाने चालवून तसेच लोकांकडून देणग्या मिळवून या शाळांचा खर्च भागविला जात असे. या शाळा ३१ मे १९५५ रोजी सरकारच्या ताब्यात दिल्या.

क] <u>प्राथमिक शाळा</u> -

वसतिगृहातील विद्यार्थ्यांची प्राथमिक शाळेत जाण्याबाबत कुचंबणा होऊ लागली. म्हणून मामासाहेबांनी मुलांसाठी महात्मा फुले विद्यामंदिर सन १९६३ मध्ये सुरु केले. मुलींसाठी सन १९६८ मध्ये जिजामाता विद्यामंदिर ही प्राथमिक शाळा सुरु केली. [ पहा आलेख क्र४२ ] या दोन्ही प्राथमिक शाळा बार्शीतील आदर्श शाळा आहेत. या शाळेत प्रवेश देतांना संस्था खूप देणगी मिळवू शकेल. पण प्रवेशासाठी देणगी घेण्यास कर्मवीर मामासाहेबांचा विरोध होता. तेच धोरण पुढे चालू ठेवून संस्था कधीही प्रवेशासाठी देणगी घेत नाही. या दोन्हीही शाळेत असणारे शिक्षक संस्थेचेच माजी विद्यार्थी आहेत. जिजामाता विद्यामंदीरातील शिक्षिका व मुलींची संख्या खालील कोष्टकांत दिली आहे.

कोष्टक क्र. ३·१

जिजामाता विद्यामंदीर बार्शी सन १९६८ ते ८८
अखेर विद्यार्थीनी व शिक्षिका संख्या.

| अ.नं. | सन | शिक्षिका संख्या | विद्यार्थीनी संख्या |
|---|---|---|---|
| १. | १९६८-६९ | २ | ९९ |
| २. | १९६९-७० | ३ | १६१ |
| ३. | १९७०-७१ | ४ | १९३ |
| ४. | १९७१-७२ | ६ | २४१ |
| ५. | १९७२-७३ | ७ | २६९ |
| ६. | १९७३-७४ | ८ | ३०३ |
| ७. | १९७४-७५ | ८ | २९५ |
| ८. | १९७५-७६ | ८ | ३०३ |
| ९. | १९७६-७७ | ८ | ३३९ |
| १०. | १९७७-७८ | ९ | ३४२ |
| ११. | १९७८-७९ | ९ | ३७४ |
| १२. | १९७९-८० | १० | ४३१ |
| १३. | १९८०-८१ | १० | ४५० |
| १४. | १९८१-८२ | ११ | ५२५ |
| १५. | १९८२-८३ | १२ | ५०२ |
| १६. | १९८३-८४ | १२ | ५३० |
| १७. | १९८४-८५ | १३ | ५३६ |
| १८. | १९८५-८६ | १४ | ५७६ |
| १९. | १९८६-८७ | १४ | ६१३ |
| २०. | १९८७-८८ | १५ | ६४५ |

ड] माध्यमिक विद्यालये :-

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्रत्येक खेडयात शाळा सुरु करण्याचे

शासनाने ठरविले म्हणून मामांनी सुरु केलेल्या व्हॉलंटरी शाळा शासनाच्या ताब्यात दिल्या. प्रत्येक खेडयात प्राथमिक शाळा सुरु झाल्या. पण माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी मुलांना शहरातच जावे लागे. म्हणून मामा-साहेबांनी ग्रामीण भागात माध्यमिक विद्यालये सुरु केली. सध्या संस्थेची १३ माध्यमिक विद्यालये आहेत. [ पहा परिशिष्ट-५]

इ] महाविद्यालये -

१९३४ साली सुरु केलेल्या मामांच्या संस्थेने २५ वर्षे सतत गोरगरीबांची है सेवा केली. त्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजात शिक्षणाविषयी गोडी निर्माण झाली. मॅट्रीकच्या नंतर शिक्षण घेण्याची अडचण पडू लागली. १८ जून १९६० रोजी बार्शीत शिवाजी महाविद्यालय सुरु केले. बार्शीतच मामांनी पुन्हा एक कामर्स कॉलेज व एक सायंविधी महाविद्यालय सुरु केले. [पहा परिशिष्ट ५] उस्मानाबाद जिल्हयात वाशी या गावी कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय १९७२ मध्ये सुरु केले.
[ पहा कोष्टक क्र. ३.२ व आलेख क्र४.३ ]

कोष्टक क्र. - ३.२

कर्मवीर मामासाहेब जगदाळे वाशी जि. उस्मानाबाद येथील विद्यार्थी संख्या.

| अ. नं. | वर्ष | मुली | मुले | एकूण. |
| --- | --- | --- | --- | --- |
| १. | १९७२–७३ | ३० | १७७ | २०७ |
| २. | १९७४–७५ | ५४ | ३०३ | ३५७ |
| ३. | १९७६–७७ | २६ | १६७ | १९३ |
| ४. | १९७८–७९ | ३७ | २५३ | २९० |
| ५. | १९८०–८१ | ४८ | १८६ | २३४ |
| ६. | १९८२–८३ | ५४ | ३१५ | ३६९ |
| ७. | १९८४–८५ | ९० | ५१६ | ६०६ |
| ८. | १९८६–८७ | १२४ | ५१८ | ६४२ |

ई] अध्यापक विद्यालय व अध्यापक महाविद्यालय–

व्हॉलंटरी शाळा सुरु केल्या तेव्हाच मामांनी चांगल्या शिक्षकांची गरज भासली होती. चांगले शिक्षक तयार करण्यासाठी मामांनी एक अध्यापक विद्यालय काढण्याचे ठरविले. कसबे तडवळे येथील रहिवाशी राजे निंबाळकर यांनी संस्थेला सुरुवातीच्या काळात ११००० रु. देणगी दिली होती. या सुरुवातीच्या काळात घटनेच्या स्मरणार्थ मामांनी "शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय" या नावाने अध्यापक विद्यालय सुरु केले. जून १९६६ साली कर्मवीर मामांनी बार्शी येथे शिक्षण महाविद्यालय सुरु केले. या महाविद्यालयात बी.एड्. बी.पी.एड्. व एम. फिल् या पदव्यासाठीचा अभ्यासक्रम सुरु आहे. पीएच.डी. पदवीसाठी मार्गदर्शनाची सोयही या महाविद्यालयात उपलब्ध आहे. या महाविद्यालयांतही प्रवेशासाठी कधीही देणगी स्विकारली जात नाही. या महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग संशोधन कार्यातही अग्रेसर आहे. येथील पाच

प्राध्यापकांनी पीएच.डी. ही पदवी संपादन केलेली आहे. या महाविद्यालयात सतत शिक्षणविषयक संशोधन चालू असते. हे महाविद्यालय जणू काही शिक्षणाची प्रयोगशाळाच आहे.

३.८ कै. कर्मवीर मामासाहेबांचे समाजकार्य व समाज शिक्षणाचे कार्य -

कर्मवीर मामांनी शिक्षण प्रसारासाठी तर कार्य केलेच पण त्याबरोबर समाज जागृतीचाही प्रयत्न केला. बहुजन समाजाच्या शिक्षणाच्या आड येणा-या गोष्टी दूर करण्याचा सतत प्रयत्न मामांनी केला.

अंधश्रध्दा व जातीभेद निर्मूलनाचे कार्य -

मामासाहेबांनी अंधश्रध्दा व जातीभेदावर जोरात हल्ले चढविले. विवाह प्रसंगी धार्मिक विधी करण्यासाठी ब्राम्हण का पाहिजे? असा त्यांनी सवाल केला. विवाह प्रसंगी कर्ज काढून खर्च करण्याबाबत ते टिका करीत. कर्मवीर युवक मंडळामार्फत मामासाहेब कमी खर्चात विवाह लावून देत. प्रा.म.भ.जगताप हे लग्न प्रसंगी धार्मिक विधी करीत. प्रा.जगताप हे जातीने मराठा आहेत.

> " देवावर अंधश्रध्दा ठेवून, दगडाचे देवावर दह्यादुधाचा अभिषेक करणा-या आणि भोपे व बडवे यांना पोसण्यासाठी देवापुढे पैसे ठेवणा-या भाविकावर त्यांचा राग होता. लहान मुलांना दूधदही द्या. त्यांना शिक्षण देवून सुशिक्षित बनवा देवळांना देणग्या देण्याऐवजी शैक्षणिक संस्थाना द्या. असा मामांचा आग्रह होता"१.

असे यशवंत इर्लेकर लिहितात.

जातीभेदाला मूठमाती मामांनी आपल्या वसतिगृहातच दिली होती. वाढपी मुले सर्वच जाती-जमातीची असत. वसतिगृहातील स्त्रिया

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सर्व जाती जमातीच्या असत. बार्शीत हरिजन सेवक संघामार्फत मामांनी जातीभेद निर्मूलनाचे काम केले. भाषणे व व्याख्याने देण्याऐवजी ते जेवणाचा कार्यक्रम आखत सर्वांना एकाच पंगतीत जेवण करण्यास सांगत.

" हरिजन सेवक संघाच्या दि. २ आक्टोबर १९४५ च्या बैठकीत हॉटेल व केशकर्तनालये यात हरिजनांना प्रवेश मिळालाच पाहिजे. यासाठी एक चळवळ उभारण्यासाठी जी समिती नियुक्त करण्यात आली. त्या समितीचे मामासाहेब एक सदस्य होते. त्यांच्या पुढाकाराने त्यावेळी ७ हॉटेल्स दलितांना खुली करण्यात आली या कार्यात सामाजिक विरोधाला त्यांनी मोठ्या धीराने तोंड दिले "[१०]

शेतक-यात जागृती -

१९४० ते ५० या काळात शेतकरी आजच्या इतका जागृत झालेला नव्हता. धान्य विकताना व्यापारी धान्य पहाण्याच्या निमित्ताने बरेच धान्य वाया घालवत. हमाली, आडत, तोलाई अशी बरीच रक्कम व्यापारी घेत. तसेच पोत्यामागे एक आणा अशी रक्कम घेत असत. ही सर्व रक्कम जाते कोठे? असा मामासाहेबांनी प्रश्न उपस्थित केला. जादा घेतली जाणारी रक्कम शेतक-यांच्या मुलांच्या शिक्षणासाठीच वापरण्यात यावी असा आग्रह मामांनी धरला. तसेच माल कोणत्याही आडतीवर नेण्यात कुणाचे बंधन असू नये. यासाठी शेतक-यात जागृती केली.

खेड्यातून ज्वारी किंवा इतर धान्य विकण्यास आणतांना नाकेदार, रामोशी व इतर लोक शेतक-यांच्या गाड्या अडवून अनाधिकृत पैशाची मागणी करीत. मामांनी शेतक-यात एकजूट करून शेतक-यांना सरळ प्रतिकार करण्यास सांगितले. जनावराच्या बाजारातही असाच अन्याय होत असे. जनावराची पावती करतांना मन मानेल तशी जादा रक्कम वसूल करीत.

" जनावर विकल म्हणजे चिठ्ठया करतांना त्यावेळी बार्शी येथील पोलीस पाटील आणि मुलकी पाटील प्रत्येक जनावरामागे नऊ आणे ते रुपयापर्यंतची रक्कम शेतक-याकडून वसूल करीत. आणि तो पैसा दारुच्या गुत्यात गडप करीत "११.

जनावरांच्या बाजारातही योग्यच रक्कम देण्याची प्रथा मामांनी सुरु केली. शेतकरी कडबा विकण्यास आणत असत त्यावेळी गाडीमागे पाच ते दहा पेंडया काढून घेतल्या जात. शिवाय दलाली निराळी असेच. सरपणाच्या गाडया विक्रीस आणलेल्या शेतक-याचीही हीच स्थिती असे. भाजी विकायास शेतकरी आणत. दलाल हातात मावेल तेवढी भाजी देवाच्या नावांनी बाजूला काढत. कापूस विक्रीच्या बाबतही असेच घडत असे.

या शेतक-याच्या पिळवणूकीची मामांना चीड येत असे. १९३७ साली त्यांनी तरुण शेतकरी संघाची स्थापना केली. तरुण शेतक-यांना एकत्र करून त्यांना स्थिती समजावून सांगितली. गुराच्या बाजारात चिठ्ठया करणाचे काम हा शेतकरी संघच करु लागला. पूर्वीच्या चिठ्ठया करणारांचे उत्पन्न बुडू लागले. मारामारीचे प्रसंग मामासाहेबावर आले. पण तरुण शेतक-यांच्या सहाय्याने मामांनी कार्य चालूच ठेवले. भाजी मार्केट, कडबा तळ, सरपण विक्री या सर्वच ठिकाणी शेतक-यावरील अन्याय नाहीसा करण्यासाठी मामासाहेब खूप झटले.

शेतक-यास भांडवलाचा नेहमीच तुटवडा पडत असतो. शेतकरी खाजगी सावकराकडून भरमसाठ व्याज दराने कर्ज घेई. व त्या कर्जातून पुन्हा मुक्तच होत नसे. मामांनी शेतक-यांना खाजगी कर्ज घेऊ नका असे सांगितले व त्यांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी पत संस्था काढल्या.

शेतकरी सुधारीत बि-बीयांणांचा वापर करीत नसत तसेच व्यापारी

शेतक-यांना खात्रीशीर बियाणे देत नसत. मामांनी स्वतः वसतिगृहाच्या शेतात बियाणे तयार केले व रास्त दराने शेतक-यांना दिले. तसेच शेतकरी शिक्षकांच्या मदतीने शेतक-यांना नवनवीन माहिती पुरविली.

दुष्काळातील कार्य :-

१९७२ ते १९७४ या काळात सोलापूर उस्मानाबाद जिल्हयात मोठा दुष्काळ पडला होता. खेडयातील जनावरे व जनता यांच्यावर अत्यंत वाईट प्रसंग आला होता. गवताच्या गाठी मागवून त्या शेतक-यांना रास्त दराने पुरविल्या. रोजगार मिळावा म्हणून बाध बंदिस्ती व विहीरीची खोली वाढविणे अशी कामे काढली. दुष्काळाच्या काळात ८५० विद्यार्थ्यांची व २५० मजूर स्त्रिया यांची जेवणाची व्यवस्था शिवाजी बोर्डिंगमध्ये केली होती.

संस्थेतील मजूरांचा सत्कार :-

कष्ट करणा-याबद्दल मामांना अत्यंत आदर असे. वसतिगृहामधील फिस्टच्या दिवशी दगड काम करणारे पायरुड यांना मुलांच्या पंगतीत जेवणास बसवत आपणही त्यांच्याच शेजारी जेवणास बसत. १९५४ साली एका इमारतीचे उद्घाटन त्यावेळचे महसूल मंत्री नामदार भाऊसाहेब हिरे यांचे हस्ते झाले ती इमारत बांधण्यासाठी श्री. मोकिंदा जाधव [वडार] व श्री. नारायण बोरगांवकर [गवंडी] यांनी खूप मेहनत घेतली होती. त्यांचा मंत्र्याच्या हस्ते आहेर देवून सत्कार केला.

१४/१/६४ शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन त्यावेळचे मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांचे हस्ते करण्यात आले. त्यावेळीही श्री. रामा पायरुड व श्री. नारायण बापू माळी [गवंडी] यांचा शेला पागोटे देऊन सत्कार करण्यात आला.

अश्वारूढ शिवाजी पुतळा -

छ. शिवाजी महाराज हे मामासाहेबांचे दैवत संस्थेच्या आवारात भव्य असा पुतळा असावा अशी मामांची इच्छा होती. सर्वांनी सहकार्य करून शिवाजी महाविद्यालयासमोर भव्य असा शिव पुतळा उभा करण्यात आला आहे.

वीरपत्नींचा सत्कार :-

ज्यांचे पती इंग्रजाविरुध्द लढताना फासावर गेले. ज्यांचे पती युध्दात कामी आले अशा विधवा वीर पत्नीबद्दल मामांना खूप आदर असे. अशा विधवांची माहिती काढून मामा त्यांचा सत्कार करून त्यांना मदत करीत असत. सुभेदार दि. ह. चव्हाण रा. पानगांव व श्री. अ. भि. पवार रा. पानगांव यांना लाहोर आघाडीवर वीरमरण आले होते. यांच्या पत्नींना मामांनी मदत केली आहे.

इतर संस्था -

कर्मवीर डॅा. मामासाहेबांनी प्रथम शिवाजी वसतिगृहाची स्थापना केली. तीच श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या नावांने संस्था रजिस्टर झाली या संस्थेमार्फत प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, अभ्यासक अध्यापक विद्यालये व विविध ठिकाणची वसतिगृहे स्थापन झाली [ पहा परिशिष्ट — ६ ]

काही वेळा विशिष्ट हेतू पूर्ती या संस्थेदारा होत नसे काही प्रशासकीय अडचणी असत. अशा वेळी मामांनी काही वेगळ्या संस्था स्थापन केल्या. श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळा मार्फत वाचनालय सुरु करतांना अनुदानाबाबतची अडचण आली तेव्हा कर्मवीर सार्वजनिक वाचनालय ही संस्था स्थापन केली.

कमी खर्चात विवाह लावण्यासाठी, आंतरजातीय विवाह लावण्यासाठी जादा तास सुरु करण्यासाठी कर्मवीर युवक मंडळ ही संस्था स्थापन झाली. कृषि विज्ञान, कामधेनु मंडळ अशा संस्था कर्मवीर मामांनी सुरु केल्या आहेत. या संस्था सध्याही व्यवस्थित चालू आहेत.

क. कर्मवीर मामांच्या संस्थेतील शिक्षणेत्तर शाखा -

मुलगा कितीही गरीब आर्थिक स्थितीचा असला तरी मामांना त्याला फुकट शिक्षण देणे आवडत नसे. त्याला होईल ते काम देण्याची व्यवस्था मामासाहेब करीत. त्यासाठी मामांनी काही शिक्षणेत्तर शाखा सुरु केल्या. या शाखांत मुलांना किंवा त्यांच्या पालकांना काम देण्याची व्यवस्था असे अशा शाखा खालीलप्रमाणे.

१] स्वस्त धान्य दुकान बार्शी.
२] स्वस्त धान्य दुकान येडशी.
३] स्वस्त धान्य दुकान चारे.
४] शेतकी व पोल्ट्री फार्मस येडशी
५] शेतकी व पोल्ट्री फार्मस उपळे
६] शेतकी व पोल्ट्री फार्मस बार्शी.
७] धेनुसंवर्धन केंद्र, बार्शी.
८] विद्यार्थी ज्ञान विकास आडत दुकान, बार्शी.
९] छत्रपती मुद्रणालय, बार्शी.
१०] कर्मवीर जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी.
११] साप्ताहिक "जीवन संग्राम" बार्शी.

## ३.९ - कर्मवीर डॉ. मामासाहेबांचा सन्मान व कर्मवीर मामासाहेबांचे महानिर्वाण.

### मामासाहेबांचे आजार -

२१ मे १९५० रोजी इमारतीचे काम चालू असतांना इमारतीवर जावून मामासाहेब कामगारांना सूचना देत होते, व मदत करीत होते. त्यांना चक्कर आली व ते खाली पडले. या अपघातात मामासाहेबांचा पाठीचा मणका व एक पाय अधू झाला. सोलापूरचे डॉ. मुळे यांनी या अपघातातून कर्मवीरांना वाचविले अपघातातून बरे झाल्यानंतर पून्हा नव्या जोमाने मामासाहेब कामाला लागले.

त्यानंतर २१ जुलै १९७४ रोजी पहाटे त्यांना अर्धांगवायूचा जोरदार झटका आला. या वेळीही सोलापूरला त्यांचेवर उपचार करण्यात आले. या आजारापसून त्यांना एकाच जागेवर पडून रहावे लागे. अशा काळातही त्यांनी जे जे संकल्प सोडले ते तडीस गेले. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरुढ पुतळा व गोरगरीबांसाठी वैद्यकीय सेवा अल्पदरात उपलब्ध व्हावी म्हणून दवाखाना हे संकल्प मामांनी सोडले स्वत: एका जागेवर खिळलेले असतांना देखील दोन्हीही संकल्प पूर्ण झालेले मामांना पहावयास मिळाले.

### जगदाळे मामा हॉस्पिटल -

इमारतीवरुन पडून झालेल्या अपघातात व अर्धांगवायूचा झटका आल्यानंतर मामावर सोलापूरला उपचार केले. सर्वसामान्य माणसाला ही वैद्यकीय सेवा बार्शीतच उपलब्ध व्हावी असे मामांच्या मनाने घेतले. २५ लाख रुपयांची ही भव्य योजना अल्पावधितच साकार झाली. यासाठी जनतेचे उत्स्फूर्त असे सहकार्य लाभले. संस्थेचे माजी विद्यार्थी डॉ. बी. वाय. यादव व डॉ. जी. एस्. पाटील यांनी अल्पावधित आपल्या सेवाभावी वृत्तीने

दवाखाना नावारूपाला आणला. मामांनी "आरोग्य मंदीर " हेच नांव दिले होते पण नंतर मामांच्या स्मृतीसाठी"जगदाळे मामा हॉस्पिटल"असे नांव देण्यात आले आहे.

विद्यापीठाकडून सन्माननीय पदव्या :-

कर्मवीर मामांचे कार्य हे असाधारण आहे. समाजातील प्रत्येक अडचणीवर मामांचा स्वत:चा उपाय आहे. कार्य करीत असतांना आलेल्या अनुभवातून ते विचार मांडत असत. मामासाहेबांच्या या शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय कार्याबद्दल मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद या विद्यापीठाने त्यांना डी. लिट. ही मानाची पदवी देण्याचे जाहीर केले. त्यावेळी मामासाहेब अर्धांगवायूच्या आजाराने एका जागेवर खिळून होते.

" मामासाहेब विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाला हजर राहू शकले नाहीत. तेव्हा दि. २४/२/१९८० रोजी मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बी.आर. भोसले, विद्यापीठातील लॉ फॅकल्टीचे डीन व संस्थेचे माजी विद्यार्थी ॲड सुखदेव शेळके, विद्यापीठ कार्यकारिणीचे मान्यवर सदस्य श्री वसंतराव काळे, व श्री. सुंदरराव गव्हाणे यांनी बार्शीला येवून समारंभपूर्वक डी. लिट. ही पदवी कर्मवीर जगदाळे मामांना अर्पण केली " १२.

म. फुले कृषी विद्यापीठ राहुरी या विद्यापीठानेही मामांना डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी बहाल केली.

कर्मवीर मामासाहेबांचे महानिर्वाण :-

जवळ जवळ सहा वर्षे मामासाहेब एका जागेवर खिळून होते. याच काळात कर्मवीर जगदाळे मामा हॉस्पिटल हा सर्व सोयीनी युक्त असा दवाखाना

तयार झाला.

३० मे १९८१ रोजी सकाळी मामासाहेबांची प्रकृती अचानक बिघडली व कर्मवीर मामांचे निधन झाले.

कर्मवीर मामांचा पूर्णाकृती पुतळा :-

कर्मवीर मामासाहेबांच्या निधनानंतर संस्थेच्या सेवकांनी व माजी विद्यार्थ्यांनी एक बैठक बोलावली. स्वर्गीय कर्मवीर मामासाहेब जगदाळे स्मारक समितीची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या आवारातच मामांचा पुतळा उभारावा असे ठरले. सर्व स्तरातील व्यक्तींनी उत्स्फूर्त आर्थिक सहाय्य केले. कर्मवीर मामांचा साडेनऊ फूट उंचीचा व ८५० किलो वजनाचा पुतळा तयार करण्यात आला. त्यागाचा व श्रमाचा संदेश देत हा पुतळा संस्थेच्या आवारात उभा आहे.

३.१० कर्मवीर मामासाहेब एक शिक्षण तज्ञ -

बहुजन समाजावर होणाऱ्या अन्यायाबाबत मामासाहेबांनी आवाज उठवला. अन्याय निवारण्यासाठी मामांनी विविध प्रयत्न केले. स्त्रियाबाबतचे मामासाहेबांचे विचार व म.फुले यांचे विचार यात बरेच साम्य होते. मामासाहेबांनी या कार्यात म.फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला होता. शिवाजी महाराज व शाहू महाराज यांचाही आदर्श मामांच्या समोर होता. अंधश्रध्दा व जातीभेद घालविण्यासाठी मामांनी प्रयत्न केले. जातीभेद नसावा याबाबत पुरोगामी विचारसरणी असलेल्यामध्ये मतभेद नव्हतेच पण जातीभेद व अंधश्रध्दा नाहीशी करण्याबाबतचे उपाय याबाबत मामांचे वेगळेपण जाणवते. याबाबत मामांनी विविध प्रयोगच केले. व ... मार्ग शोधला.

हर्बर्ट स्पेन्सर, रूसो, जॉन डूई इ. शिक्षण तज्ञांचे विचार माहित करून घेण्याच्या भानगडीत मामासाहेब पडले नाहीत. पण मामांच्या कार्यात मात्र

शिक्षण तज्ञांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसते. महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर यांचेही शिक्षण विचार मामासाहेबांच्या कार्यात दिसतात.

हर्बर्ट स्पेन्सर आपल्या शिक्षण विषयक तत्वज्ञानात सांगतात.

> " मनुष्य जितके कष्ट करील, तितकीच त्याची सहनशक्ती वाढेल, व त्या प्रमाणात तो सुदृढ व समर्थ होईल. भोजनात पौष्टिक, पाचक, वैचित्र्यपूर्ण परंतु संतुलित आहारावर त्याने भर दिला आहे"१३.

मामासाहेबांनी याही पुढे जाऊन आपल्या वसतिगृहात तर आहार, व्यायाम व श्रम यांची योग्य सांगड घातली होती. "श्रमा शिवाय जेवण नाही " असे म्हणण्यासही मामासाहेब कचरत नसत.

स्वानुभवास मामा फार महत्व देत. प्राप्त स्थितीत आपणच मार्ग शोधला पाहिजे. व्यवहारात जीवनात उपयोगी पडेल तेच तत्वज्ञान होय अशी मामांची धारणा होती. तत्वज्ञानाबाबत जॉन डूईचे सुद्धा पहाण्यासारखे आहे.

> " तत्वज्ञान तेच की, जे व्यवहारात उपयुक्त ठरते. जीवनातील समस्या सोडविण्यासाठी, जीवन अधिक सुंदर व प्रगत करण्यासाठी ज्याचा उपयोग होऊ शकतो. यथार्थ तत्वज्ञान हे पुस्तकातून प्राप्त होत नाही, ते अनुभवातून कृतीतून , जीवनातून उदयास येते. जे प्रायोगिकतेच्या कसोटीला उतरेल, जे कृतीत, व्यवहारात, जीवनात उतरवता येईल त्याच तत्वज्ञानाचा आपण स्वीकार करायला हवा" १४.

स्त्री शिक्षणबाबतचा समाजाचा दृष्टीकोन बदलण्यासाठी, अंध:श्रध्दा निर्मूलनासाठी, शेतक-यांत जागृती करण्यासाठी, ग्रामीण भागातील मुलांचा -

रहाण्या जेवण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी व आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांना काम देण्यासाठी मामांनी अनुभवातून उपाय योजना केली. प्रत्यक्ष कृती व्यवहारात आणतांना गरजेनुसार त्यात बदल केले. चिंतन केले व वरील समस्यावर उपाय सुचविले.

मामांनी समस्याबाबत विचार केला. प्रयोग केले, चिंतन केले व नंतर समस्येवरील उपाय निश्चित केले.

म्हणून मामासाहेब चिंतनातून केवळ तत्वज्ञान सांगणारेच नव्हते तर स्वत: केलेल्या प्रयोगातून तावून सुलाखून आलेला विचार सांगणारे शिक्षणतज्ञ होते.

=:=:=:=:=

## संदर्भ


१] व. न. इंगळे : तपस्या श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे नियतकालिक " मकरंद " तर्फे प्रकाशित १९६८ पृष्ठ क्रमांक - १९

२] -------किता ---------------- पृष्ठ क्रमांक २१

३] व. न. इंगळे चंद्रकांत मोरे नारायण जगदाळे : संपादक, सुवर्णकलश श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी सुवर्ण महोत्सव स्मरणिका १९८५ पृष्ठ क्रमांक-३१.

४] म. के. गव्हाणे : लेख - समाज भूषण कर्मवीर मामासाहेब जगदाळे मासिक मराठा जागृती ११ सी १४ - तात्या धारपुरे पथ गिरगाव मुंबई-४००००४ जानेवारी-८१ पृष्ठ क्रमांक- ६.

५] व. न. इंगळे : तपस्या श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे नियतकालिक " मकरंद " तर्फे प्रकाशित १९६८ पृष्ठ क्रमांक -९५

६] सौ. विमल माळकर : लेख- कर्मवीरांच्या आठवणी परिवर्तन शिक्षण महाविद्यालय बार्शीचे नियत कालिक १९८१-८२ पृष्ठ क्रमांक- २२.

| | | |
|---|---|---|
| ७] | कर्मवीर मामासाहेब जगदाळे | : उपलब्ध टेपवरुन. |
| ८] | व. न. भिंगळे<br>चंद्रकांत मोरे<br>नारायण जगदाळे | : संपादक सुवर्ण कळस श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी सुवर्ण महोत्सव स्मरणिका - १९८५ पृष्ठ क्रमांक- पस्तिस. |
| ९] | ---------किता --------------- | पृष्ठ क्रमांक -६१. |
| १०] | डॉ. कुन्ता जगदाळे | : संपादिका, कर्मयोगी चिथवाणी प्रकाशन, बार्शी १९७८ पृष्ठ क्रमांक-३६. |
| ११] | व. न. भिंगळे | : तपस्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे नियतकालिक "मकरंद" तर्फे प्रकाशित १९६८ पृष्ठ क्रमांक-६७ |
| १२] | व. न. भिंगळे<br>चंद्रकांत मोरे<br>नारायण जगदाळे | : संपादक सुवर्ण कळस श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी सुवर्ण महोत्सव स्मरणिका - १९८५ पृष्ठ क्रमांक-पन्नास. |
| १३] | म. बा. कुंडले | : शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी श्री. विद्या प्रकाशन २५० शनिवार अष्टभुजा रस्ता पुणे-३० दुसरी आवृत्ती-१९७५ पृष्ठ क्रमांक -५० |
| १४] | -------किता ---------------- | पृष्ठ क्रमांक ५६१. |


:::::::::